# परिशिष्ट ४

# प्राकृत साहित्य प्रकार

प्राकृत भाषेमध्ये अनेक विषयांवरील साहित्य रचले गेले. जसे – तत्त्वज्ञानविषयक साहित्य, शिलालेखीय साहित्य, शास्त्रीय महाकाव्ये, चरित काव्ये, मुक्तक काव्ये, सट्टक व नाटक साहित्य व कथा साहित्य. याच बरोबर पुराण, इतिहास, ज्योतिष, भूगोल, खगोल आदी विषयांवर प्राकृत भाषेमध्ये विपुल साहित्य दिसून येते. त्यापैकी आपण कथासाहित्य आणि त्यातील महत्त्वाचे चार कथाग्रंथ यांची माहिती घेणार आहोत.

## १) प्राकृत कथा साहित्य

संपूर्ण जगामध्ये प्रत्येक देशाचे प्रत्येक भाषेमध्ये कथासाहित्य सापडते. या कथांचे उद्देश्य वेगवेगळे असतात. काही वेळा केवळ मनोरंजन हाच उद्देश असतो तर काही वेळा काही उपदेश देणे व तात्पर्य सांगणे हा उद्देश असतो. प्राकृत साहित्यामध्ये जे कथासाहित्य आहे त्याचा मूळ उद्देश कथांच्या द्वारे धर्मोपदेश आणि आत्मकल्याण करणे हाच आहे.

प्राकृत कथा साहित्यामध्ये कथांचे तीन मुख्य प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे अकथा, विकथा व कथा. जी कथा, एखादा अज्ञानी माणूस चुकीच्या समजुतीने सांगतो, स्पष्ट करतो, त्यामुळे या संसारात परिभ्रमण करण्याचे कारण ठरते, ती अकथा होय. ज्या कथेमुळे, समाज विकृत होतो समाजामध्ये वाईट गुण वाढीला लागतात, ती कथा विकथा होय. ज्या कथेमुळे समाजामध्ये तप, संयम, दान शील सारखे चांगले गुण वाढीस लागून समाजकल्याण साधले जाते, ती कथा किंवा सत्कथा होय.

कथांचे विश्लेषण विषयांच्या दृष्टीने अर्थकथा, कामकथा, धर्मकथा आणि मिश्रकथा असे ही केलेले आढळते. या कथांमध्ये अनुक्रमे पैशाअडक्याशी संबंधित, गृहस्थजीवन, धर्माचरण व हे सर्व विषय एकत्र असे चार प्रकारचे विचार येताना दिसतात. कथेतील पात्रानुसारसुद्धा कथांचे प्रकार ठरविले आहेत. म्हणजे दिव्य, मानुषी आणि दिव्यमानुषी. ज्या कथांमध्ये दिव्य किंवा दिव्य/देवलोकातीलच पात्रे असतात, ती कथा दिव्य कथा होय. ज्या कथेमध्ये दिव्यलोकातील तसेच मानवी पात्रे असतात, ती कथा दिव्यमानुषी. तर ज्या कथेमध्ये फक्त माणसेच असतात, ती कथा मानुषी होय.

याशिवाय कथांचे इतरही पाच प्रकार सांगितले आहेत. ते असे – सकलकथा, खंडकथा, उल्लापकथा, परिहासकथा व संकीर्णकथा. ज्यामध्ये शेवटी सर्व ईप्सित गोष्टी प्राप्त होतात, ती सकल कथा होय. खंडकथेचा आत्मा अगदी छोटा असतो आणि ती आपल्या जीवनातील एखाद्याच अनुभवावर आधारित असते. उल्लावकथा ही एक प्रकारे साहसकथा असून त्यामध्ये समुद्रयात्रा, विविध साहसकथा यांचा समावेश केलेला असतो तर परिहासकथा ही व्यंगात्मक असून जीवनातील प्रसंगावर मार्मिक टीका करणारी असते. संकीर्णकथा ही या चारही कथांचे मिश्रण असून, शेवटी धर्मकथेच्या स्वरूपात असते.

प्राकृत साहित्यामध्ये या सर्व प्रकारच्या कथा सापडतात, उदा. हरिभद्रसूरिविरचित – समराइच्चकहा, उद्योतनसूरिविरचित– कुवलयमालाकहा, विविध रामकथा इत्यादी. आपण या पुस्तकामध्ये तरंगलोला, कुवलयमालाकहा इ. कथांचे विषय व त्यांची हाताळणी पाहिली आहे.

---

## २) कुवलयमालाकहा

कुवलयमालाकहा हा ग्रंथ उद्योतनसूरी यांनी लिहिला आहे. उद्योतनसूरी यांना दाक्षिण्यचिह्न अशी पदवी देखील होती. उद्योतनसूरींचा काळ इ.स. ७७८ मानला जातो. कुवलयमालाकहा ही एक कथा आहे. प्राकृत साहित्यामध्ये कथा हे माध्यम धर्मोपदेशासाठी वापरले जाते. या कथांचे स्वरूप प्राकृत साहित्यामध्ये कसे सांगितले आहे, ते आपण पाहिले आहे. कुवलयमालाकहा हे नाव नायिकेच्या नावावरून दिले आहे.

कथावस्तू - मध्य देशामध्ये विनीता नावाची नगरी असते. तिथे दृढवर्मा नावाचा राजा राज्य करत असतो. त्याची पट्टराणी प्रियंगुश्यामा असते. एकदा दृढवर्मा राजाचा सेनापती सुषेण मालवदेश जिंकून येतो. तेंव्हा मालवदेशाच्या पाच वर्षाच्या राजपुत्रालासुद्धा आणतो. दृढवर्माराजाने त्याला जवळ घेतल्यावर तो राजपुत्र रडू लागतो. त्या राजकुमाराचे पालनपोषण राजा दृढवर्मा करू लागतो. यथावकाश दृढवर्मा राजाला प्रियंगुश्यामा राणीपासून मुलगा होतो. त्याचे नाव कुवलयचन्द्र असे ठेवले जाते. कुमार मोठा झाल्यावर समुद्रकल्लोल नावाच्या घोड्यावर स्वार होतो. तेंव्हा तो घोडा कुवलयचंद्राला घेऊन जंगलाकडे पळून जातो. त्याचवेळेस एका अदृश्य शक्तीकडून प्रहार होऊन घोडा मरून पडतो व आकाशवाणी राजकुमाराला दक्षिण दिशेला जायला सांगते. दक्षिण दिशेला असलेल्या विंध्य पर्वताच्या जंगलात गेल्यावर कुवलयचन्द्राला एक साधू दिसतात त्यांच्या एका बाजूला सिंह बसलेला असतो. ते मुनी कुवलयचंद्राला आकाशवाणी विषयी माहिती देतात. तसेच घोड्याने पळवून नेण्याचे रहस्य सांगतात. मुनी म्हणतात की वत्सदेशामध्ये कौशांबी नगरीमध्ये पुरंदरदत्त नावाचा राजा व वासव नावाचा प्रधान आहे. उद्यानात धर्मानंद आचार्यदेखील आपल्या शिष्यांसहित आलेले असतात. महाराज पुरंदरदत्त मुनींना विरक्तीचे कारण विचारतो तेव्हा ते सांगतात की क्रोध, अभिमान, माया, लोभ, मोह हे पाच कषाय हेच संसार परिभ्रमणाचे प्रमुख कारण आहे. या कषायांमुळे परिभ्रमण करणाऱ्या चंडसोम, मानभट, मायादित्य, लोभदेव व मोहदत्त यांच्या अनेक जन्मांच्या कथा कुवलयमालाकथा या ग्रंथामध्ये सांगितल्या आहेत. हे पाचहीजण संयमाचे पालन करून मरण पावल्यानंतर सौधर्म नावाच्या स्वर्गात उत्पन्न होतात व एकमेकांना मोक्षासंदर्भात आठवण करून देण्याचे ठरवतात/निश्चय करतात.

यानंतर त्यांचा जन्म अनुक्रमे वणिक्पुत्र, राजपुत्र, सिंह, कुवलयमाला व कुवलयचन्द्र यांच्या रूपात होतो. कुवलयमाला ही दक्षिणापथातील विजया-नगरीतील विजयसेन राजाची कन्या असते. ती पुरुषांचा द्वेश करणारी असते. तिचा विवाह अयोध्यानगरीचा राजकुमार कुवलयचंद्राशी होण्याचे भाकित केलेले असते. या भाकिताप्रमाणेच सर्व गोष्टी होतात. तसेच एकमेकांना भेटल्यानंतर आत्मकल्याणाची आठवण करून देऊन प्रबोधित करतात.

कुवलयमालाकथा ही मुख्यत्वेकरून क्रोध, मान, माया इ. पाच कषायांचा परिणाम दाखविण्यासाठी लिहिली आहे. या कथेमध्ये चमत्कार, साहस, अद्‌भुतता इ. सर्व घटकांचा समावेश असल्यामुळे कथा रंजक झाली आहे. या रंजकतेबरोबरच कथा उपदेशप्रधानसुद्धा आहे. साहित्यशास्त्रीयदृष्ट्यासुद्धा ही कथा सुंदर दृष्टांत, अलंकार, काव्य यांनी नटलेली आहे.

## ३) लीलावती कहा

काव्यशास्त्रज्ञांच्या मतानुसार 'लीलावतीकहा' ही पद्य-कथा आहे. रुद्रटाने केलेल्या व्याख्येप्रमाणे या काव्यात महाकाव्याचे लक्षण दिसते. महाकवी कुतूहल हा या महाकाव्याचा कवी आहे. आपल्या वंशाची ओळख करून देताना तो सांगतो की त्याच्या आजोबांचे नाव बहुलादित्य होते व वेदविद्येमध्ये पारंगत होते. ते इतके यज्ञ करीत होते की त्या धुरामुळे चंद्र देखील काळ्या रंगाचा झाला होता असे म्हटले जाते. याचप्रमाणे त्यांनी त्यांचे वडील भूषणभट्ट हे चारही वेदांचे महान पंडित होते असेही सांगितले. या पंडित-परंपरेतील कुटुंबात लीलावती-कथेचा लेखक कवी कोऊहल (कुतूहल/कौतूहल) याचा जन्म झाला होता. जरी त्याने स्वत:ला अज्ञानी, काव्यक्षेत्रात मतिमंद म्हटले असले तरी यामध्ये कवीचा विनय, निरहंकार व पूर्वकवींच्या विषयाची आदर भावना व्यक्त होते. प्रस्तुत काव्याची रचना कोठे व केव्हा झाली याचा स्पष्ट उल्लेख सापडत नाही. काही इतर पुराव्यांवरून कोऊहलाचा काळ इ. स. ७५० ते ८४० मध्ये सिद्ध होतो.

प्रस्तुत कथेत प्रतिष्ठान (वर्तमान पैठण) चा राजा सातवाहन (अथवा शालिवाहन) व सिंहलद्वीपा (वर्तमान श्रीलंका) ची राजकुमारी लीलावती यांच्या प्रेमकथेचे रसभरित वर्णन आलेले आहे. यामध्ये प्रासंगिक उपकथांच्या धागेदोऱ्यांची वीण अत्यंत आकर्षक आहे. राजर्षी विपुलाशयाला रंभा नावाच्या अप्सरेपासून झालेल्या मुलीचे नाव कुवलयावली होते. संधी साधून तिने गंधर्वकुमार चित्रांगदाबरोबर प्रेम-विवाह केला. यामुळे विपुलाशय खूप क्रोधित झाला व त्याने चित्रांगदाला

शाप दिला. त्यामुळे चित्रांगद भीषणासन नावाचा राक्षस झाला. कुवलयावली दु:खाने आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाली. परंतु रंभेने तिला धीर दिला व नलकूबर यक्षाच्या आश्रयाला ठेवले.

नलकूबराचे लग्न वसंतश्री नावाच्या विद्याधरीशी झाले होते. त्यांच्या मुलीचे नाव महानुमती होते. महानुमती व कुवलयावली या दोघींमध्ये घनिष्ठ मैत्री झाली. एकदा त्या दोघी विमानात बसून मलयपर्वतावर गेल्या. तेथे महानुमतीचे माधवानल नावाच्या सिद्धकुमारावर प्रेम जडले. तेथून परत आल्यावर ती त्याच्या विरहाने दु:खी राहू लागली. नंतर त्या दोन्ही मैत्रिणी गोदावरीच्या तटावर भवानीची पूजा करीत राहू लागल्या.

लीलावती-कथेत सिंहलाची राजकन्या लीलावती हिचा जन्म शारदश्री विद्याधरीपासून झाला होता. एके दिवशी लीलावती प्रतिष्ठानच्या राजाचे (सातवाहन-हाल) चित्र बघून त्याच्या प्रेमात पडली. ती आपल्या आई-वडिलांची आज्ञा घेवून त्याच्या शोधार्थ बाहेर पडली. रस्त्यात गोदावरीच्या तटावर महानुमतीशी तिची भेट झाली. महानुमतीने तेथेच तिला कुवलयावलीचाही परिचय करून दिला. आता तिन्ही विरहिणी धर्माराधना करीत काळ घालवू लागल्या.

प्रतिष्ठानचा राजा सातवाहन प्रतापी सम्राट होता. त्याने सिंहलद्वीपावर आक्रमण करण्याचे ठरविले. तेव्हा त्याच्या सेनापतीने त्याला युद्ध न करण्याचा सल्ला दिला. राजाने सेनापतीला सिंहलराजाच्या जवळ दूत म्हणून पाठविले. दुर्दैवाने त्याची नाव फुटल्यामुळे तो गोदावरीच्या काठावरच थांबला. सेनापतीला समजले की लीलावती आपल्या मैत्रिणींबरोबर तेथे राहत आहे. त्याने परत जाऊन सातवाहनाला सूचना दिली. सातवाहन राजा सैनिकांबरोबर तेथे पोहोचला व लीलावतीला मागणी घातली. लीलावती म्हणाली, महानुमतीचा प्रियकर माधवानल जो पर्यंत तिला मिळत नाही तो पर्यंत ती लग्न करणार नाही.

लीलावतीची प्रतिज्ञा ऐकून राजा सातवाहन पाताळलोकात गेला व तेथून माधवानलाची सुटका करून त्याला घेऊन आला. त्यानंतर त्याने भीषणानल राक्षसावर आक्रमण केले. युद्धात झालेल्या जखमांमुळे तो परत राजकुमार झाला.

याप्रमाणे कर्मधर्मसंयोगाने नलकूबर, विद्याधर हंस व सिंहलद्वीपाचा राजा सर्वच एकत्र आले. त्यांनी आपल्या मुलींची लग्ने त्यांच्या इच्छेप्रमाणे समोर उपस्थित वरांशी लावून दिली. त्या प्रसंगी विद्याधर, किन्नर, सिद्ध, यक्ष, राक्षस व मनुष्य यांनी आनंद व्यक्त करीत वर-वधूंना विविध सिद्धी प्रदान करून आशीर्वाद दिला.

लीलावतीकथा एकसंधपणे लिहिलेली आहे. तिचे भाग पाडलेले नाहीत. संपूर्ण कथा विविध अलंकार, छंद यांनी नटलेली असून विविध रस, निसर्गसौंदर्य, पर्वत, नद्या, वन-उपवन, सूर्योदय-सूर्यास्त यासारखी वर्णनेही आली आहेत.

## ४) समराइच्चकहा

समराइच्चकथेचे प्राकृत साहित्यात महत्त्वपूर्ण स्थान आहे. ही धर्मकथा आहे. या कथेचे लेखक आचार्य हरिभद्रसूरी हे आहेत. ते विद्याधरगच्छातील साधू होते. गच्छपती आचार्यांचे नाव जिनभट्ट, दीक्षागुरूंचे नाव जिनदत्त व पालनपोषण करणाऱ्या मातेचे नाव साध्वी याकिनी महत्तरा असे होते. त्यांचा जन्म राजस्थानातील चित्तोडनगरमध्ये झाला होता. हरिभद्रसूरी हे जन्माने ब्राह्मण होते. त्यांच्या विशेष पांडित्यामुळे तेथील राजा जितारी याचे ते राजपुरोहित होते. दीक्षा घेतल्यानंतर जैन साधू म्हणून त्यांचे आयुष्य विशेषकरून राजपुताना व गुजरात प्रांतात व्यतीत झाले.

आचार्य हरिभद्रांच्या जीवनात बदल घडवणारी घटना त्यांच्या धर्म परिवर्तनाची आहे. त्यांची अशी प्रतिज्ञा होती की 'ज्या विद्वानाचे वचन मी समजू शकणार नाही त्याचे शिष्यत्व मी पत्करेन.' एके दिवशी राजाचा मदोन्मत्त हत्ती त्याला बांधलेला खांब उचलून नगरात पळू लागला. हत्तीने अनेक लोकांना चिरडून टाकले. हरिभद्र जीव वाचविण्यासाठी एका उपाश्रय (साधू साध्वी वसती करतात ते स्थान) मध्ये आले. तेथे याकिनी महत्तरा नावाच्या साध्वीला खालील गाथेचे वाचन करताना ऐकले -

चक्कीदुगं हरिपणगं पणगं चक्कीण केसवो चक्की।
केसव चक्की केसव दु चक्की केसव चक्की य।।

या गाथेचा अर्थ त्यांना समजला नाही म्हणून त्यांनी साध्वीला त्याचा अर्थ विचारला. साध्वीने त्यांना आचार्य जिनदत्ताजवळ पाठविले. आचार्यांनी स्पष्ट केलेले अर्थ ऐकून त्यांनी तेथेच त्याक्षणी दीक्षा घेतली. नंतर त्यांची विद्वत्ता व सदाचरण बघून आचार्यांनी हरिभद्रांना आपले पट्टशिष्य केले. हरिभद्रसूरींनी त्यांच्या धर्मपरिवर्तनास कारणीभूत साध्वी याकिनी महत्तरा यांना आपली धर्ममाता मानले. ते स्वतःला याकिनीसूनु असे म्हणवीत असत. आचार्य हरिभद्रांचा काळ सामान्यत: इ.स. ८५७ मानला जातो.

आचार्य हरिभद्रसूरी जैन साहित्यातील अत्यंत प्रज्ञावान व विचारवंत लेखक आहेत. धर्म, दर्शन, न्याय, कथासाहित्य व योगसाधना इत्यादी विषयी अनेक विषयांवर गंभीर व पांडित्यपूर्ण रचना उपलब्ध आहे. 'अनेकांतपताका' सारखा कठीण न्यायग्रंथ लिहिणारे हरिभद्र समराइच्चकहा व धूर्ताख्यानासारखे सुरस मनोरंजक कथाप्रधान ग्रंथांची रचना करतात ही आश्चर्याची गोष्ट आहे. एकीकडे हृदयाची सरलता व बुद्धीची प्रौढता दिसून येते. आचार्य हरिभद्रांनी एकूण १४४४ ग्रंथ लिहिले असे मानले जाते.

'समराइच्चकहा' या ग्रंथाचा मुख्य विषय जन्मोजन्मींच्या कर्मांचा परिणाम आहे. समरादित्य उज्जैनीचा राजकुमार होता. पूर्वजन्मात समरादित्याचे नाव गुणसेन होते व त्याच्या प्रतिस्पर्धी नायकाचे नाव अग्निशर्मा होते. जंबुद्वीपावर असणाऱ्या विदेह देशात क्षितिप्रतिष्ठित नावाचे नगर होते. तेथे पूर्णचंद्र नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या मुख्य राणीचे नाव कुमुदिनीदेवी असे होते. या दांपत्याला गुणसेन नावाचा मुलगा झाला. या राजाच्या पुरोहिताचे नाव यज्ञदत्त होते. यज्ञदत्ताला अग्निशर्मा नावाचा मुलगा झाला. तो कुरूप होता. कुतूहलाने कुमार गुणसेन मुलांच्या घोळक्याबरोबर अग्निशर्माला गाढवावर बसवून, त्याच्या डोक्यावर तुटक्या सुपाचे छत्र ठेवून, ढोल, मृदंग, बासरी इत्यादी वाद्य वाजवित नगराच्या रस्त्यांवर मिरवित असे. राजकुमाराच्या या वागण्यामुळे अग्निशर्मा खूप दुःखी होई. दररोज त्याला अपमान सहन करावा लागत असे. म्हणून तो अशा आयुष्याला कंटाळला होता. त्यामुळे अग्निशर्मा गुणसेनाचा अधिकाधिक द्वेष करू लागला व कौंडिन्य नावाच्या तापस कुलपतीच्या जवळ जाऊन अग्निशर्म्याने तापस-दीक्षा घेतली. परंतु दीक्षा घेऊनही अग्निशर्मा सतत गुणसेनाशी असणारे वैरच चिंतित असे. त्यामुळे या दोघांचे वैर नऊ जन्मे सुरू राहिले. म्हणून राजकुमार गुणसेन व अग्निशर्मा यांचे नऊ जन्म या कथेत वर्णिले आहेत.

नायक शुभकर्मांच्या फळामुळे शाश्वत सुख प्राप्त करतो व प्रतिनायक किंवा खलनायक हा त्याच्यामधील शत्रुत्वामुळे अनंत संसारात भ्रमण करतो. या कथेत गुणसेनाचे व्यक्तित्व सद्गुणी व त्या उलट अग्निशर्माचे व्यक्तित्व वाईट भावांच्या अभिव्यक्तीचे आहे. गुणसेनाचे जीवन मोक्षमार्गाकडे जाणारे व अग्निशर्माचे जीवन अधोगतीला जाणारे होते.

## ५) वसुदेवहिंडी

भारतीय साहित्यातच नव्हे तर विश्वकथासाहित्यातही वसुदेवहिंडीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. वसुदेवहिंडीमध्ये संघदासगणींनी प्राकृत भाषेमध्ये वसुदेवाच्या भ्रमणाचा वृत्तांत लिहिला आहे. हे वासुदेव कृष्णाचे पिता होते म्हणून या कथाकृतीला 'वसुदेव-चरित' असेही म्हणतात. 'वसुदेवहिंडी' हा ग्रंथ इ.स.च्या ६ व्या शतकात किंवा तत्पूर्वी लिहिला गेला असावा असे मानले जाते. या ग्रंथात मुख्यत्वाने हरिवंशाची महती सांगितली आहे व त्याबरोबर कौरव पांडवांच्या कथा देखील गुंफल्या आहेत.

हा ग्रंथ गद्य-पद्य मिश्रित आहे. ग्रंथाची भाषा प्राचीन महाराष्ट्री प्राकृत आहे. भाषा, साहित्य, इतिहास इत्यादी विविध दृष्टिंनी या ग्रंथाचे महत्त्व आहे. या ग्रंथाचे प्रथम आणि द्वितीय असे दोन खंड आहेत. पहिल्या खंडात २९ लंबक (अध्याय) असून त्यामध्ये अकरा हजार श्लोकप्रमाणात विस्तार आहे. दुसऱ्या खंडात ७१ लंबक आणि सतरा हजार श्लोकप्रमाणात विस्तार आहे. संपूर्ण ग्रंथात १०० लंबक आहेत. प्रथम खंडाचे रचनाकार संघदासगणी व दुसऱ्या खंडाचे रचनाकार धर्मदासगणी आहेत.

वसुदेवहिंडीत कथानकाचे सहा भाग केले आहेत. कथोत्पत्ती प्रकरणानंतर व पीठिका या भागामध्ये ५० पृष्ठांचे धम्मिल्लहिंडी नावाचे एक स्वतंत्र व महत्त्वपूर्ण प्रकरण आहे. या धम्मिल्लहिंडी प्रकरणात धम्मिल्ल नावाच्या सार्थवाहपुत्राची कथा आलेली आहे. त्याने देश विदेशात भ्रमण करून बरेच विवाह केले. कुरंगपुरामध्ये जितशत्रू राजा आपली पत्नी धारिणी हिच्या बरोबर राहत होता आणि राज्य करीत होता. या नगरात सुरेंद्रदत्त नावाचा अत्यंत श्रीमंत सार्थवाह सुखाने राहत होता. त्याच्या पत्नीचे नाव सुभद्रा होते. गर्भावस्थेत तिला धर्माचरणाविषयी डोहाळे लागले. म्हणून मुलाचे नामकरण धम्मिल्ल असे केले. 'धम्मिल्लहिंडी' नावाच्या या स्वतंत्र कथानकात धम्मिल्ल हा नायक प्रथम धार्मिक वृत्तीचा असतो. मित्रांकडून त्याला रसिक बनविण्याचा खटाटोपात तो वसंततिलका नावाच्या गणिकेच्या प्रेमात पडून तिच्याच घरी राहू लागतो. तो निर्धन झाल्यावर गणिकेची माता धम्मिल्लाला हाकलण्याचा प्रयत्न करते. धम्मिल्ल किती निरुपयोगी आहे, हे विविध उदाहरणांनी पटवते असे हे कथानक आहे.

शीलमती, धनश्री, विमलसेना, ग्रामीण गाडीवान, वसुदत्ताख्यान, रिपुदमन, नरपती, चारुदत्त इत्यादी आख्यानके, या खूपच सुंदर लोककथा आहेत. या कथांमध्ये लोककथांची सर्व लक्षणे व गुण आहेत. शेवटी धम्मिल्लाच्या सुनंदभव आणि सरहभव ह्या आख्यानकांचाही समावेश आहे. वसुदेवहिंडी हे प्राकृतमधील अनेक चरित्र, कथा इ.चा स्रोत आहे. यामध्ये तत्कालीन समाज, संस्कृती, चालीरीती इ. विषयी माहिती मिळते. मनोरंजनाबरोबरच कुतूहल आणि ज्ञानवर्धनाचाही विचार केला आहे. असे असूनही धर्मोपदेशाचीही गुंफण सुंदर पद्धतीने केलेली दिसते.